(5)

जा.क्र.साआ/उपपदार्थ/कक्ष-12/इथेनॉल निर्मिती /हेल्थसर्टिफिकेट परिपत्रक/2018
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे
दिनांक - 16/ 11 /2018

प्रती,
चेअरमन/कार्यकारी संचालक
सहकारी साखर कारखान्या मर्या-

विषय :- सहकारी साखर कारखान्याचे इथेनॉल निर्मिती प्रकल्प अहवालासाठी हेल्थ सर्टिफिकेट बाबत.

संदर्भ :- 1. साखर आयुक्तालय महाराष्ट्र पुणे परिपत्रक No.CS.BYP/DPR of SSKs.2003 Date 30.08.2003.
2. साखर आयुक्तालय महाराष्ट्र पुणे परिपत्रक जाक्र./साआ/कक्ष-4/अर्थ-6/प्र.क्र.33/07,दि.31.07.2007

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे आधुनिकीकरण ,सहवीज निर्मिती व इतर उपपदार्थ निर्मिती प्रकल्प,इतर भांडवली खर्चाचे प्रस्ताव आधुनिकीकरण व प्रशासकीय मंजूरीसाठी या कार्यालयाकडे प्राप्त होत असतात.

केंद्रशासनाने ' बायोफयुएल पॉलिसी ' जाहिर केलेली आहे.तसेच इथेनॉल 2022 पर्यंत 10 टक्के आणि 2030 पर्यंत 20 टक्के पेट्रोलमध्ये मिसळण्यासाठी नियोजन केलेले आहे. त्यासाठी साखर कारखान्यांनी डिस्टिलरी प्रकल्पाची आधुनिकीकरण करणे आणि त्यामध्ये इन्सीरनेशन बॉयलर बसविणे तसेच नवीन डिस्टीलरी प्रकल्प उभा करणे यासाठी अनुक्रमे रु.20 कोटी आणि रु.80 कोटी पर्यंतच्या कर्जास 5 वर्षासाठी 6% व्याज अनुदान जाहीर केलेले आहे. आणि त्यासाठी रु.4420 कोटी रक्कम राखीव ठेवलेली आहे.

अशा प्रकारे इथेनॉल निर्मिती आणि वितरणासाठी मोठया प्रमाणावर प्रोत्साहन दिलेले आहे. ज्या सहकारी साखर कारखान्यांना खाद्यान्न मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून इथेनॉल निर्मिती प्रकल्पाबाबत व्याज अनुदानासाठी परवानगी दिलेली आहे, त्या सहकारी साखर कारखान्यांचे प्रस्ताव विनाविलंब मंजुरीची प्रक्रिया पारपाडण्यासाठी त्यांना हेल्थ सर्टीफिकेट घेण्यासाठी आवश्यकता राहणार नाही. त्यांनी संबंधित एजन्सी कडून डि.पी.आर. तयार करुन या कार्यालयास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी घेवायाची आहे. सदर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी कारखान्याच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करुन दिली जाईल.

आयुक्त, साखर
महाराष्ट्र राज्य, पुणे.

Adwad 16/11/18   16-11-18   o/c

प्रत-

प्रादेशिक सहसंचालक (साखर) सर्व यांना कार्यवाही साठी रवाना.